वर्ष-०९ | अंक-०८ | मुंबई, मंगळवार १० ते १६ जानेवारी - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

PG 2

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

आईचा व बाळाचा आहार

3 → अणुसंमीलन ऊर्जेचा आश्वासक प्रवास

राज्याच्या शाश्वत विकासातही पत्रकारांचे महत्त्वपूर्ण योगदान : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## खबरदार

### नायलॉन मांजा बाळगणाऱ्यांवर होणार गुन्हे दाखल



प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या विक्री व वापराविरूद्ध जिल्हा प्रशासन अँक्शन मोडवर आले असून नायलॉन मांजा बाळगणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले आहेत.जिल्ह्यात महानगरपालीका क्षेत्रात झोननिहाय तसेच  नगरपालीका क्षेत्र व ग्रामीण भागात देखील समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्यांनी संबंधीत पोलीस ठाणेदार यांच्या समवेत नायलॉन मांजा विक्री होत असलेल्या तसेच नॉयलॉन मांजाचा वापर करणाऱ्यांविरूध्द तत्काळ गुन्हे नोंदवून कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. नायलॉन मांजाच्या वापराविरूध्द कारवाईचे नियोजन करण्यासाठी जिल्हाधिकारी इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती सभागृह येथे आज बैठक घेण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते. बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर, पोलिस उपायुक्त मुमक्का सुदर्शन, महानगरपातिकेचे अतिरिक्त आयुक्त राम जोशी, शिक्षणाधिकारी (माध्यमीक) रवींद्र काटोलकर, नगरपालीका प्रशासन अधिकारी अतुल पंत तसेच इरदृष्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, ...पान ३ वर...

## प्रेमात ब्रेकअप ! संतापलेल्या तरुणानं प्रेयसीच्या नव्या प्रियकराची केली हत्या, कल्याणमध्ये चौघांना अटक



एका तरुणाने प्रेमविरहामुळे प्रेयसीच्या नवीन प्रियकराची हत्या केल्याची घटना कल्याण पूर्वेत (Kalyan East News) घडली होती. भर रस्त्यात घडलेल्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी कोळशेवाडी पोलिसांनी (Kolshewadi Police News) गुन्हा दाखल करत आरोपींचा शोध सुरू केला आणि अवघ्या 24 तासात पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी ललित उजैनकर याच्यासह त्याचे साथीदार नकुल भोईटे ,राहुल चव्हाण ,सागर गांगुर्डे यांना अटक केली आहे.  पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याण पूर्वेकडील खडेगोलवली परिसरात शनिवारी रात्रीच्या सुमारास भर रस्त्यात एका तरुणाची चाकूने हल्ला करत काही जणांनी हत्या केल्याची घटना घडली होती. आदित्य बर असं मयत तरुणाचं नाव असून ही हत्या ललित उज्जैनकर आणि त्याच्या साथीदारांनी केल्याचं तपासात उघड झालं होतं. ललित उज्जैनकर याचे दिवा येथे राहणाऱ्या एका मुलीशी काही वर्षांपासून प्रेमसंबंध होते. मात्र त्यांचं काही दिवसांपूर्वी ब्रेकअप झालं होतं. काही कारणास्तव दोघांमध्ये काही महिन्यांपूर्वी ब्रेकअप पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काही कारणास्तव या दोघांमध्ये काही महिन्यांपूर्वी ब्रेकअप झालं. त्यानंतर सदर मुलीची गोवंडी येथे राहणाऱ्या आदित्य याच्याशी मैत्री झाली. प्रेम संबंध तुटल्याने ललित उज्जैनकर हा संतापला होता. ...पान ३ वर...

## दाऊद इब्राहिम टोळीला गुटखा कारखान्यासाठी मदत, न्यायालयाने 3 आरोपींना ठोठावली 10 वर्षांची शिक्षा



मुंबई - अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम टोळीला कराचीमध्ये गुटखा कारखाना सुरू करण्यासाठी मदत केल्याप्रकरणात तीन आरोपींना दहा वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. गुटखा व्यवसायिक जे एम जोशी, जमीरुद्दीन अन्सारी आणि फारुख मन्सुरी असे न्यायालयाने शिक्षा ठोठावलेल्या आरोपींची नावे आहेत. मुंबई सत्र न्यायालयातील विशेष मकोका न्यायाधीश बी डी शेळके यांनी याबाबतचा निर्णय दिला.कराचीत सुरू करायचा होता गुटखा कारखाना पाकिस्तानमधील कराचीत दाऊद इब्राहिमच्या टोळीला गुटखा कारखाना सुरू करण्यासाठी मदत केली गेली होती. या प्रकरणी तीन आरोपींना दोषी ठरवल्यानंतर आज शिक्षा सुनावण्यात आली. यामध्ये गुटखा व्यावसायिक जे एम जोशी, जमीरुद्दीन अन्सारी आणि फारुख मन्सुरी यांचा समावेश आहे. विशेष मकोका न्यायाधीश बी डी शेळके यांनी शिक्षेची सुनावणी केली. गुटखा व्यावसायिक जे एम जोशी आणि रसिकलाल धारिवाल यांनी दाऊदला मदत केल्याचे सिध्द झाले आहे. यातील जोशी ...पान ३ वर...

## पुणे: महिलेचा पाठलाग करून छायाचित्र काढणारे खासगी गुप्तचर संस्थेतील दोन डिटेक्टिव्ह गजाआड




महिलेचा पाठलाग करुन तिचे लपून छायाचित्र काढणे एका गुप्तचर संस्थेतील कर्मचाऱ्यांना अंगलट आले. महिलेने पाठलाग होत असल्याची तक्रार पुणे पोलिसांच्या महिला सहाय कक्षात दिल्यानंतर साध्या वेशातील पाळत ठेवून दोघांना पकडले. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्या विरोधात कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलेश लक्ष्मणसिंग परदेशी (वय २५, रा. वडगाव मावळ), राहुल गुणवंतराव बिरादार (वय ३०, रा. देहूगाव, ता. मावळ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. निलेश परदेशी याची खासगी गुप्तचर संस्था असून बिरादर सहायक..पान ३ वर...

## जालन्यातील सराफा बाजारात खळबळ ! चक्क भिंत तोडून साडेआठ लाखांचा मुद्देमाल चोरीला



काही दिवसांपूर्वी जालना शहरातील एका प्रसिध्द कापड दुकानात चोरी झाल्याची घटना ताजी असतानाच, आता जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील सराफा बाजारमध्ये ज्वेलर्सचे दुकान फोडून सोन्या (Gold),चांदीच्या (Silver) दागिन्यासह साडेआठ लाखांचा मुद्देमाल घेऊन चोरांनी पळ काढला आहे. धक्कादायक म्हणजे दुकानात प्रवेश करण्यासाठी चोरट्यांनी थेट दुकानाची भिंतच तोडली असल्याचे समोर आले आहे. मात्र याची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन एका आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. मोहमद युसुफ अली ह्यात (रा. झारखंड)  असे या चोरट्याचे नाव असून ताच्याविरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील सराफा बाजारमध्ये औदुंबर बागडे (वय 36 वर्ष, रा. नुतन वसाहत अंबड ता. अंबड जि. जालना) यांची ज्वेलर्सची दुकान आहे. दरम्यान आज 9  जानेवारी रोजी पहाटे साडेतीन वाजता पाच चोरट्यांनी बागडे यांच्या दुकानाच्या मागच्या बाजूला भिंतीस होल करून दुकानात प्रवेश केला. त्यानंतर या चोरट्यांनी ताब्यातील दोन मोठे गॅस कटर व एक लहान गॅस सिलेन्डर, लोखंडी रॉड, दोन लोखंडी गिरमिट, कानस व इतर साहित्याच्या मदतीने दुकानाच्या पाठीमागील लोखंडी दरवाजा गॅस कटरने कापला. आत प्रवेश केल्यावर दुकानातील दोन लहाण लोखंडी तिजोरी गॅस कटरने कापले. तसेच कपाटातील सोन्या-चांदी दागिने लंपास केले.  पोलिसांनी धाव घेत एकाला पकडले...  अंबड सराफा बाजारातील एका ज्वेलर्सच्या दुकानात चोरट्यांनी डल्ला मारला असल्याची माहिती मिळताच अंबड पोलिसांनी घटनास्थळी तत्काळ धाव घेतली. यावेळी पोलिस अलर्ट होत त्यांनी परिसरात चोरट्यांचा शोध सुरु केला असता, मोहमद युसुफ अली ह्यात (रा. झारखंड)  हा पोलिसांच्या हाती लागला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून, इतर चार आरोपी मात्र फरार झाले आहेत. त्यामुळे पोलिसांनी औदुंबर बागडे यांच्या तक्रारीवरून अंबड पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. तर इतर आरोपींचा पोलीस शोध घेत आहे.

## विवाहित महिलेशी अश्लिल चॅटिंग ; नामांकित कंपनीच्या सुपरवायझरची पोलिसांसमोरच



नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यात पोलीस स्टेशन समोरच नागरिकांनी विनयभंग प्रकरणातील आरोपीची 'धुलाई' केल्याची घटना घडली. याचा व्हिडीओ शहरात चांगलाच व्हायरल झाला आहे. आरोपीचे नाव रघुवेंद्र उपाध्याय असून तो मौदा तालुक्यातील एका नामांकित खाजगी कंपनीचा सुपरवायझर आहे.

प्राप्त माहितीनुसार आरोपीने तीन आठवड्यांपूर्वी त्याच्याच कंपनीत काम करणाऱ्या एका महिलेसोबत अश्लिल चॅटिंग केली होती. तसेच संबंधित महिलेला अश्लील हातवारे करुन व्हिडीओ कॉलही केला होता. यातून पिडीता घाबरली. तिने घडलेला प्रकार आपल्या पतीला सांगितले. त्यानंतर दोघा पती-पत्नींनी पोलिस स्टेशन गाठून घडलेला प्रकार सांगत तक्रार केली. मात्र पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास विलंब केला. पोलिसांनी आरोपी विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केल्यानंतरही त्याला अटक केली जात नव्हती. त्यामुळे स्थानिक बीजेपी कार्यकर्त्यांनी कालपासून पोलीस स्टेशन समोरच आंदोलन सुरू केले होते. रविवारी सायंकाळी पोलीस आरोपीला अटक करुन पोलीस स्टेशनला ...पान ३ वर...


## पोलिसांशी हुज्जत घालणे पडले महाग, मोटारचालक अटकेत



पुणे : रस्त्यात लावलेली मोटार काढण्यास सांगितल्याने मोटारचालकाने वरिष्ठ पोलीस निरीक्षकाशी हुज्जत घातल्याची घटना विमाननगर भागात घडली. पोलिसाशी हुज्जत घालून अरेरावी करणाऱ्या मोटारचालकाला विमानतळ पोलिसांनी अटक केली. अभिनंदन सखाराम गायकवाड (३७, रा. कुमार प्राइमवेरा सोसायटी,वडगावशेरी) असे अटक करण्यात आलेल्या मोटारचालकाचे नाव आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक रवींद्र ढावरे यांनी विमानातळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विमाननगर भागातील खालसा डेअरी परिसरात वाहतूक कोंडी झाली होती. विमानतळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक आणि पोलीस अधिकारी वाहतूक कोंडी हटविण्यासाठी प्रयत्न करत होते. त्या वेळी गायकवाड याने रस्त्यात मोटार लावल्याचे आढळून आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी गायकवाडला रस्त्यात लावलेली मोटार काढण्यास सांगितले. तेव्हा 'तुला माझी मोटार दिसली का? इतर गाड्या दिसत नाही का?', असे सांगून गायकवाडने हुज्जत घालण्यास सुरुवात केली. 'मी गाडी काढणार नाही. काय करायचे ते करा. मी तुमच्याकडे बघून घेतो', अशी धमकी देऊन गायकवाडने शासकीय कामात अडथळा आणला. गायकवाडला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याला अटक केली. पोलीस उपनिरीक्षक बी. बी. वाकडे तपास करत आहेत.




# सूर्यप्रकाशामुळे स्मृतिभ्रंशाचा धोका कमी



संशोधकांनी २९० लोकांवर व्हिटॅमिन डीच्या प्रभावाचा अभ्यास केला. स्मृतिभ्रंश झालेल्या व्यक्तीची स्मरणशक्तीच कमकुवत होते असे नाही, तर मनाचा समन्वय साधण्याची क्षमताही कमी होते. त्यामुळे रुग्णाला दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, जगातील ५५ दशलक्ष लोक स्मृतिभ्रंशाने ग्रस्त आहेत. स्मृतिभ्रंशाचे बहुतेक रुग्ण वृद्ध असतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, २०३० पर्यंत, रुग्णांची संख्या ७८ दशलक्ष होईल. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेचा मेंदूच्या क्षमतेवर गंभीर परिणाम होतो. व्हिटॅमिन डीचा अल्झायमरवर काय परिणाम होतो हे शोधण्यासाठी १९९७ मध्ये संशोधन सुरू झाले. संशोधन पथकाने मेंदूच्या चार भागात व्हिटॅमिन डीचे प्रमाण पाहिले. दोन अल्झायमरशी संबंधित होते. एक स्मृतिभ्रंश घडवणारे मानले जाते तर दुसरे वयानुसार स्मरणशक्ती कमी होण्याशी संबंधित असल्याचे सांगते.

संशोधकांना आढळून आले की, जास्त व्हिटॅमिन डी असलेल्यांची स्मरणशक्ती चांगली असते. हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची कमतरता जास्त असते. संशोधनानुसार, आशियातील अर्ध्याहून अधिक ५७ टक्के हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची तीव्र कमतरता असते. उन्हाळ्यात हा आकडा ५१ टक्क्यांपर्यंत वाढतो. काळ्या लोकांसाठी हा आकडा ३८.५ टक्के आहे. शास्त्रज्ञांनी सांगितले की, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे ६० वर्षांवरील लोकांमध्ये मानसिक दुर्बलता वाढते. सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा मुख्य स्रोत आहे. जगातील १०० दशलक्ष लोकांमध्ये व्हिटॅमिन डीची कमतरता आहे. 'नेचर जर्नल'मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, जगातील १०० कोटी लोक व्हिटॅमिन डीच्या कमतरतेचे बळी आहेत. भारताबद्दल बोलायचे झाले तर ४९ कोटी लोकांकडे पुरेसे व्हिटॅमिन डी नाही. यापैकी ३१ टक्के मुले आणि किशोरवयीन आहेत. या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे मुलांमध्ये मुडदूससारखे आजार होऊ शकतात. सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा मुख्य स्रोत आहे.

# मेंदूतील केमिकल लोचा...



माणसाचं मन शांत असणं ही एक आदर्श स्थिती आहे. त्याचप्रमाणे माणसाचा मनाजोगा उत्कर्ष होणं ही पण एक आदर्श स्थिती आहे. परंतु एकाच वेळी दोन्हीही स्थिती प्राप्त होत असताना त्या माणसाचं मन अशांतच असतं. तो त्याच्या ध्येयामागे धडपड करत असतो. या प्रयत्नात त्याचं मन गुंतलेलं असतं. त्यामुळे चांगल्या प्रकारे का होईना पण मन यावेळी अशांतच असतं. अशावेळी मनावर ताण निर्माण होतो.

माणसाला जाणतेपणी आणि अजाणतेपणी उत्कर्ष व मन:शांती या दोन्ही गोष्टी एकाच वेळी पाहिजे असतात. पण उत्कर्ष आणि मनाची शांती यांच्यातला संघर्ष हा मानवी जीवनातला मूलभूत संघर्ष आहे. प्रगती हवी असेल तर कष्टाची गरज असते. आणि कष्टासाठी मनात ईर्षा, प्रेरणा असावी लागते. ईर्षेच्या, प्रेरणेच्या अभावी माणूस काहीही करू शकत नाही. जिथे ईर्षा, प्रेरणा आहे तिथे मनाला शांती नाही. ध्येयपूर्तीचा ध्यास माणसाला लागला की तो माणसाच्या मनाचा कब्जा घेत नाही तोपर्यंत त्याच्या ध्येयाप्रत पोहोचू शकत नाही. पर्यायाने मनाला शांतता लाभत नाही. आपल्याला आलेला ताण दूर होण्यासाठी ताणाचं मूळ कारणच दूर होणं आवश्यक असतं. त्यासाठी ताण निर्माण करणारी परिस्थिती आपल्याला नेमकी समजायला हवी. ती नेमकी समजली तरच त्यातली समस्या आपल्याला स्पष्ट दिसेल. मग तिची संभाव्य उत्तरं लक्षात घेऊन ती कोठे आणि कशी मिळवता येतील याची रूपरेषा आखता येते. त्याद्वारे आराखडा ठरवून कृती केली की, ताणाचा निचरा होईल.

* ताणाचा निचरा होण्यासाठी प्रभावी मार्ग म्हणजे व्यायाम. मात्र ताण असताना कोणताही व्यायाम करण्यापेक्षा असाच व्यायामप्रकार निवडावा की ज्यामध्ये शरीराच्या अनेक सांध्यांची हालचाल होईल, पण दमछाक होणार नाही. अशा प्रकारांत संथ गतीनं दीर्घकाळ पायी चालणं, संथ गतीनं सायकल चालवणं किंवा संथ गतीन पोहणं, योगासनं इ. समावेश होतो. व्यायामात स्नायूंचं आकुंचन-प्रसरण होणं जसं अभिप्रेत असतं तसचं स्नायूंच्या कमाल शक्तीच्या दोन तृतीयांश एवढी शक्ती वापरून स्नायूंचं जे आकुंचन होईल ते सहा सेकंद टिकवून धरणं म्हणजे व्यायाम होय.

* ताणाच्या परिस्थितीत स्नायूंचं आकुंचन दीर्घकाळ टिकून राहतं त्यामुळे त्यात नेहमीएवढं रक्त जाऊ शकतं नाही. शिवाय स्नायूंमध्ये तयार होणारं लॅक्टिक ॲसिड रक्तप्रवाहाबरोबर बाहेर न पडल्याने अंगही दुखू लागतं व स्नायूंवर विपरीत परिणाम होतो. ताणाच्या परिस्थितीत होणारे हे विपरीत परिणाम टाळण्यासाठी स्नायूंना पुरेसा प्राणवायू आणि ऊर्जा मिळायला हवी. त्यासाठी स्नायूंची हालचाल म्हणजेच आकुंचन-प्रसरण होण्याची नितांत गरज आहे. म्हणूनच व्यायामाला पर्याय राहात नाही.

* दूरपर्यंत पायी फिरायला जाणं हा पण एक ताणाचा निचरा करण्यासाठी उत्तम मार्ग ठरतो. पण या प्रकारात मानसशास्त्रीयदृष्ट्या आणखी एक फायदा होतो तो म्हणजे समस्या निर्माण झालेल्या ठिकाणापासून शरीरदृष्ट्या आपण दूर जातो. अशाप्रकारे दूर गेल्यानंतर आपलं मनही त्या समस्येपासून दूर जातं. मनासाठी हा बदल आवश्यक असतो, गरजेचा असतो. मनाला रंजन हवं असतं. आपण लांब फिरायला गेलो की तेथे वारा वाहात असतो, झाडांची पानं हालत असतात. काही गळत असतात. ताणाच्या परिस्थितीपेक्षा हे वातावरण वेगळं असतं. त्यामुळे या बदलाचा मनावर परिणाम होतो आणि ते उल्हासित होतं.

* मनाच्या तीन मूलभूत गरजा असतात. (अ) थोपटणं, (ब) बदल, (क) वेळापत्रक.

**थोपटणे :** आपल्या मनाला प्रेमाने थोपटण्याची गरज असते. त्यामुळे आपलं कोणीतरी आहे, ही आपली म्हणवणारी व्यक्ती आपल्या पाठीशी आहे, आपल्याला कोणत्याही संकटात तिचा आधार आहे, हा दिलासा जसा मनाला शांतवत असतो तसंच आपण एकटे नाही ही भावना वाढीला लागून मनाला उत्साह प्राप्त होतो. मन कृतिप्रवण होण्यास मदत होते. तसंच या व्यक्तीला आपलं कौतुक आहे, किंवा आपणही काही कौतुकास्पद गोष्टी करत आहोत किंवा केल्या आहेत किंबहुना करू शकतो ही भावना अशा थोपटण्याने निश्चितच वाढीला लागते. यातून माणसात आत्मविश्वास निर्माण होतो. आत्मविश्वास निर्माण होणे किंवा असलेला वाढीला लागणं ही तर जीवनातल्या आनंदाची मूलभूत गरज असते. त्यामुळे ती भागवली जाणं फारच महत्त्वपूर्ण ठरतं. म्हणून आपल्या मनासाठी कोणीतरी थोपटण्याची जी गरज असते ती भागवली जाते.

**बदल :** आपल्या मनाला बदलाची नितांत गरज असते आणि तीही वेळोवेळी! हा बदल जागेचा, वातावरणाचा, परिसराचा, कामाचा, एवढंच नव्हे तर कपड्यांचा, भेटणाऱ्या माणसांचा, दैनंदिन कार्यक्रमाचा असा कशातलाही बदल मनाला ताजतवानं करू शकतो. मनाची प्रसन्नता वाढवू शकतो. म्हणून अशा प्रकारचा बदल मनाला लाभतो आहे की नाही याची खात्री करून घेणं सहकार्याचं ठरतं.


**वेळापत्रक :** आपल्या मनाला सतत व्यग्रतेची गरज असते. त्यादृष्टीने एक काम पूर्ण झालं की पुढे आपण काय करणार याची आखणी किंवा तजवीज असणं आवश्यक असतं. जोपर्यंत मनाला माहीत असतं की आपला विश्रांती व्यतिरिक्तचा आजचा वेळ कार्यक्रमात, किंवा या कामात व्यतीत होणार आहे. तोपर्यंत मन त्या-त्या कृतीत व्यग्र राहतं. जेव्हा आता पुढे काय करायचं? अशी स्थिती उद्भवते तेव्हा माणसाला कंटाळा येऊ लागतो. या कंटाळ्याच्या मन:स्थितीत नको ते; नको तसे म्हणजे थोडक्यात नकारार्थी विचार त्याच्या मनात येऊ लागतात. त्याचवेळी आपल्या हातून काहीतरी चुकीचं घडू शकतं म्हणून अशी वेळ येणार नाही अशी खबरदारी घ्यावी, त्यादृष्टीने आपण आज काय काय करणार याची दररोज आखणी करावी. म्हणजे मन अशा यादीत व्यग्र राहते व शांतही राहते.

**वाचन किंवा चिंतन :** प्रत्येक भाषेतील विविध पुस्तकातील विचार कालातीत आहेत. त्यांच्या वाचनाने, मननाने, चिंतनाने माणसाला मार्गदर्शन मिळतं. मन दैनंदिन जीवनातल्या ताणतणांपासून दूर राहात. प्रसंगी आपल्या समस्यांना अशा साहित्यातून उत्तरही सापडू शकतं. याप्रमाणे ताणाचा निचरा होण्यासाठी अशा प्रकारांचा अवलंब केल्यास मनावरील आलेला ताण दूर होण्यास उपयोग होईल व आपण ह्या सुंदर जगाचा आनंद लुटू शकू. * समूहात जावं, उठावं, बसावं, चर्चा करावी. वैचारिक देवाणघेवाण करावी यातून आपलं मन मोकळं होऊ शकतं. आपलं म्हणणं कोणीतरी ऐकून घेतल्यानेही मनावरचा ताण कमी व्हायला मदत होते. अशा चर्चेतून आपल्या समस्येचे उत्तरही मिळू शकते.

**कर्मकांड :** कोणतीही कृती अथवा कोणतेही कामं ठरावीक वेळी किंवा ठरावीक पद्धतीने करण्याचं बंधन आपण आपल्यावर घालून घ्यावं. त्यामुळे ते काम त्याचवेळी आणि त्याच पद्धतीने पार पाडण्यासाठी आपलं मन तत्पर राहतं.

# आईचा व बाळाचा आहार







बाळाचा आहार सुरू होतो आईच्या पोटात असतानाच! गर्भारपणात आईने सकस आहार घेतला तर बाळाला सर्व आहारघटक योग्य प्रमाणात मिळून बाळाची वाढ उत्तम प्रकारे होते. आहाराच्या प्रमाणापेक्षा या काळात आहाराची प्रत सुधारणे जास्त महत्त्वाचे आहे. यासाठी प्रथिने (अंडी, डाळी व कडधान्ये, दूध), कॅल्शियम (नाचणी, राजगिरा, दुग्धजन्य पदार्थ, तीळ, बदाम) आणि लोहयुक्त पदार्थ (अळिव, बाजरी, खारीक, काळे मनुके, पालेभाज्या) यांचा आहारात समावेश करावा. या काळात घरचे ताजे अन्न घ्यायला हवे व बाहेरचे अन्न, तळलेले पदार्थ, शीतपेये, अतिगोड पदार्थ टाळावेत. गरोदरपणात होणाऱ्या वजनवाढीकडेही बारीक लक्ष द्यायला हवे. गर्भधारणेपूर्वी वजन कमी किंवा जास्त असल्यास हे गर्भारपणातील वजनवाढीचे गणित बदलते.

**० ते ६ महिने : केवळ स्तनपान :** बाळाचा जन्म झाल्यानंतर एक तासाच्या आत बाळाला स्तनपान करणे आवश्यक आहे. सुरुवातीचे २-४ दिवस येणारे पिवळसर दूध (कोलोस्ट्रम) म्हणजे बाळासाठी पहिले लसीकरणच! स्तनपानास विलंब केल्यास हेच दूध बाळाला मिळत नाही. जितके लवकर स्तनपान सुरू करू तितके दूध लवकर येते आणि तितक्याच लवकर आईची तब्येतही सुधारते. स्तनपानामुळे आई-बाळात भावनिक बंध तयार होतो. स्तनपानाला कोणतीही पूर्वतयारी लागत नाही, कोणताही खर्च नाही की जंतुसंसर्गाचा धोका नाही. पहिले सहा महिने निव्वळ स्तनपानावर असणारी मुले सुदृढ तर असतातच, शिवाय त्यांच्यामध्ये आजारी पडण्याचे, अतिसाराचे प्रमाण अतिशय कमी असते. हे सगळे फायदे लक्षात घेऊन घरातील सर्वांनीच स्तनपानाला पाठिंबा दिला पाहिजे आणि त्यासाठी आईला योग्य सहकार्य केले पाहिजे.

**६ ते १२ महिने : वरचे अन्न सुरू करणे :** बऱ्याच घरांमध्ये, विशेषतः शहरांमध्ये बाळाला वरचे अन्न द्यायची घाई केली जाते. आईला नोकरीच्या ठिकाणी रुजू व्हायचे असते, दूध पुरत नाही किंवा बाळाचे पोट भरत नाही अशी शंका येते, रात्री उठून बाळाला स्तनपान द्यायचा कंटाळा येतो, बाळ खूप गुटगुटीत दिसावे असे वाटते म्हणून अशी बरीच कारणे यामागे असतात. पण सहा महिन्यांच्या आधी वरचे अन्न सुरु करणे बाळासाठी चांगले नाही. बाळाची पचनशक्ती सहा महिन्यांत पुरेशी विकसित झालेली नसते. सहा महिन्यांच्या आधी वरचे अन्न सुरु केल्यास अपचन, अतिसार, जंतुसंसर्गाचा धोका वाढतो. याउलट परिस्थितीदेखील काही ठिकाणी, विशेषतः ग्रामीण भागात, बघायला मिळते. वरचे अन्न सुरु करायला सहा महिन्यांपेक्षा जास्त उशीर केला जातो. हे देखील बाळाच्या वाढीच्या दृष्टीने चांगले नाही. यामुळे बाळाची वाढ अपुरी होऊ शकते. सहा महिने ते १२ महिने (एक वर्ष) या काळात सुरुवातीला पातळ, मग काही काळानंतर मऊसर व पचायला सोपे अन्न द्यावे. या काळात सुरुवातीला तांदळाची पेज, डाळीचे पाणी, नाचणीची पेज, फळांचे रस, भाज्यांचे सूप व हे पचायला लागल्यानंतर मऊ खिचडी, फळांचा गर, मऊ शिजवलेल्या भाज्या, अंड्याचा पिवळा भाग, ताजे दही यांचा समावेश करावा. एक वर्षापर्यंतच्या काळात वरचे दूध, गहू, अंड्याचा पांढरा भाग, साखर व मिठाचा वापर पूर्णपणे टाळावा. वरचे अन्न तयार करताना आणि बाळाला देताना योग्य ती स्वच्छता पाळणे देखील जंतुसंसर्ग टाळण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. बाळाच्या पहिल्या वाढदिवसापर्यंत बाळाचे वजन साधारण जन्मावेळेसच्या वजनाच्या तिप्पट व्हायला हवे.

**१ ते २ वर्ष : घरचे अन्न, आहारविषयक सवयी :** बाळ एक वर्षाचे झाल्यानंतर बाळाला घरचे सगळे अन्न देता येते. फक्त खूप तिखट, तेलकट आणि मसालेदार पदार्थ टाळावेत. या काळात बाहेरील अन्नपदार्थ विशेषतः बिस्किटे, चिप्स, चॉकलेट्स देणे पूर्णपणे टाळावे. साखर, गूळ, मिठाचा वापर अगदी मर्यादित करावा. बाळ खात नाही म्हणून ऊठ-सूट सगळ्यात साखर-गूळ-तूप घालू नये. या काळातच बाळाला आहारविषयक चांगल्या सवयी लावाव्या-जेवणाच्या आधी हात धुणे, आपल्या हाताने खाणे, सगळ्या भाज्या, फळे, डाळी, उसळी खाणे, पाण्याबरोबर न गिळता नीट चावून खाणे, अन्नाला नावे न ठेवणे, जेवणानंतर हात व तोंड धुणे, चुळा भरणे इ. बाळाबरोबर पालकांनीही काही गोष्टी कटाक्षाने टाळाव्या- टी.व्ही. किंवा मोबाइल दाखवत भरवणे, भूक नसतानाही जबरदस्ती खायला घालणे, जेवणात तूप-साखर/जॅम/सॉस/लोणचे असे पदार्थ देणे.

# वाढत्या खर्चामुळे उपचार टाळण्याकडे कल

एका संशोधनानुसार, २२ टक्के वृद्ध लोक खर्चात बचत करण्यासाठी वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत रुग्णालयात जाण्यास इच्छुक नाहीत. त्याऐवजी ते घरीच राहणे पसंत करत आहेत. पन्नास ते साठ वयोगटातील लोक, महिला आणि आरोग्य विमा नसलेले किंवा कमी पगार असलेले लोक खर्च जास्त असल्याने उपचार टाळतात. वैद्यकीय आणीबाणी नसलेल्यांनाही खर्चाची चिंता असते. बरेचदा आरोग्य विमा कंपन्यांनाही सेवा संरक्षणाची पुरेशी माहिती नसते. लोक आपत्कालीन सेवांसाठी आपल्या खिशातून पैसे देत आहेत. आरोग्य विमा उतरवल्यानंतरही काही लोकांना विमा आपत्कालीन सेवा संरक्षणाची माहिती नसते. याखेरिज रुग्णाचा विमा अपेक्षित कंपनीऐवजी अन्य कंपनीकडून काढला असल्यासही आपत्कालीन सेवा देणारे रुग्णालय बिलामध्ये कोणताही नवा खर्च जोडू शकत नाही. अशा कारणांमुळे वैद्यकीय खर्च चर्चेत आहे.

# तरुणांमधील वाढता रक्तदाब



तरुण वयात आपल्याला एखादा आजार झाला आहे हे मान्य करणे अनेकांना फार कठीण जाते. मान्य केलेच तरी त्याबद्दल काहीही उपाय करण्याचे अनेकदा टाळले जाते, पण अशा दुर्लक्ष करण्यामुळे, टाळाटाळीमुळे अनेकदा सहज बरा होऊ शकणारा आजार बळावत जातो. फार पूर्वी रक्तदाबाचा त्रास चुकूनच एखाद्याला व्हायचा. काही काळानंतर परिस्थिती बदलली आणि हा उतार वयातील किंवा पन्नाशीनंतरचा आजार म्हटला जायला लागला, पण आज आपल्याला जगभरात विशी आणि तिशीतील तरुणांमध्ये रक्तदाबाचा त्रास दिसू लागला आहे.

निरोगी माणसाचा रक्तदाब ८०/१२० असायला हवा. हा वरचा आकडा सिस्टोलिक, खालचा आकडा डायस्टोलिक असे म्हणतात. ९०/१३० ते ११०/१४० च्या मध्ये कुठेही जर हे आकडे राहात असतील तर त्याला उच्च रक्तदाब असे म्हटले जाते. आज तरुणांमध्ये वयाच्या विशीत आणि तिशीत रक्तदाबाचा त्रास सुरू होण्याचे प्रमाण वाढत आहे.

सुरुवातीला अनेकदा ह्या त्रासाची लक्षणे सहज लक्षात येत नाहीत. म्हणून याला सायलेंट किलर असेही म्हणतात, पण सतत रक्तदाब जास्त राहिल्याने हृदयावर ताण येतो. त्यामुळे मग पुढे हृदयाचे विकार सुरू होण्याची शक्यता वाढते. रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊन रक्तवाहिन्यांची लवचिकता कमी होणे, किडनीवर ताण येऊन किडनीचे आजार सुरू होणे, मेंदूला नीट रक्तप्रवाह न मिळाल्याने लकवा येणे, डायबिटीस होणे, लैंगिक जीवनात कमजोरी किंवा अडथळे येणे, आंधळेपणा येणे, घोरणे, म्हणजे झोपताना श्वास घेण्यात अडथळा येणे असे अनेक आजार दुर्लक्षित रक्तदाबामुळे होऊ शकतात. रक्तदाबाचा त्रास सुरू होण्याची अनेक कारणे आहेत, पण ही जवळजवळ सर्व कारणे बदललेले राहणीमान या महत्त्वाच्या घटकाकडे बोट दाखवताना दिसतात.

**आपला रक्तदाब आटोक्यात ठेवण्यासाठी :** रोजच्या आहारात भरपूर फळे आणि भाज्या ह्यांचा समावेश करावा. घरचे सकस भोजन घ्यावे. आपल्या रोजच्या आहारातून फॅट्सना काढून टाकावे. तळलेल्या, जड पडणाऱ्या पदार्थांमध्ये, जंक फूडमध्ये फॅट्स् मोठ्या प्रमाणावर असतात. हवाबंद प्लॅस्टिकमधील खाद्यपदार्थ खाणे टाळावे. दिवसभरातील मिठाच्या वापरावर थोडा आळा ठेवावा. रक्तदाब खूप नसेल तर मीठ पूर्ण बंद करण्याची गरज नाही, पण कमी नक्की करावे. रक्तदाबाचा त्रास कमी करण्यासाठी वजन कमी करणे फार गरजेचे असते. शरीराचा स्थूलपणा जितका वाढत जातो तितकाच हृदयावरचा ताण आणि रक्तदाबाचा त्रास वाढत जातो.

दररोज शारीरिक व्यायामासाठी वेळ काढणे महत्त्वाचे आहे. रोज कमीत कमी एक तास चालणे, धावणे, नाच करणे, पोहणे, एखादा आवडीचा मैदानी खेळ खेळणे आवश्यक आहे. रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी दारू, सिगारेट किंवा इतर कोणत्याही उत्तेजनात्मक ड्रग्जचे सेवन बंद किंवा अगदी कमी करावे. मानसिक ताणाचादेखील रक्तदाब वाढवण्यात हातभार असतो; त्यामुळे मानसिक ताण आटोक्यात ठेवा. त्यासाठी प्राणायाम, योगा दररोज सुरू ठेवा.

**वेगवेगळे उपाय :** दुय्यम प्रकारचा रक्तदाब हा हार्मोन्सच्या कमी जास्त पातळीमुळे, किडनीच्या आजारांमुळे, दारू किंवा इतर काही ड्रग्जमुळे सुरू होतो. या प्रकारच्या रक्तदाबासाठी औषधे सुरू करणे महत्त्वाचे असते. तरुणांमध्ये रक्तदाबाचा आजार जितक्या झपाट्याने वाढतो आहे, तो तितक्याच सहज आटोक्यात आणता येऊ शकतो, गरज आहे ती फक्त सजगपणे जगण्याची.



संपादकीय...

## अणुसंमीलन ऊर्जेचा आश्वासक प्रवास

अक्षय ऊर्जेसाठी अणुसंमीलन भट्टीचा ('फ्युजन रिॲक्टर') पर्याय शोधला जातो आहे. या माध्यमातून ऊर्जानिर्मितीचे स्वप्न मानव गेल्या सहा दशकांपासून पाहात आहे. ते साकार करण्याच्या प्रयत्नांना हळूहळू आकार येत आहे. विज्ञानातील प्रगतीच्या दिशांचा मागोवा घेणाऱ्या मासिक सदरातील पहिला लेख.जगाची ऊर्जेची गरज पहाता अणुऊर्जा हा एक मोठा पर्याय आपल्याजवळ उपलब्ध आहे. अद्यापही युरेनिअम, थोरिअमचे साठे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत आणि त्याचा उपयोग विविध प्रकारच्या अणुभट्ट्यांमध्ये होत आहे आणि तशा प्रकारच्या अणुभट्ट्या विकसित करणे हेच खरे आव्हान पुढच्या काळात आहे. अणुउर्जा ही युरेनियमच्या अणुविखंडन प्रक्रियेतून मोठ्या प्रमाणात मिळविली जाते आणि पृथ्वीवरील सर्व अणुभट्ट्या या अणुविखंडन पद्धतीवर अवलंबून आहेत. पण सध्या अणुसंमीलन भट्टीचा पर्याय शोधला जातो आहे. संमीलन अणुभट्टी अर्थात 'फ्युजन रिॲक्टर' माध्यमातून ऊर्जानिर्मितीचे स्वप्न मानव साठ वर्षांपासून पहात आहे. कारण ती एक अक्षय उर्जा ठरणार आहे, हे शास्त्रज्ञांना ठाऊक आहे.

पृथ्वीवर मुबलक प्रमाणात उपलब्ध असणारे ड्युटेरिअम इंधन त्यास कारणीभूत आहे. निसर्गात सूर्य व तत्सम ताऱ्यांमध्ये अणुसंमीलन प्रक्रियेतून ऊर्जेची निर्मिती होते. त्याचे एक कारण तेथे उपलब्ध असणारे प्रचंड तापमान व प्लाझ्मा पकडून ठेवणारे गुरुत्वाकर्षण. त्यामुळे अब्जावधी वर्षांपासून ही प्रक्रिया स्वयंचलित आहे. याच आधाराने शास्त्रज्ञ पृथ्वीवरही अणुसंमीलन प्रक्रियेच्या माध्यमातून ऊर्जानिर्मितीचे प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी काही देश एकत्र येऊन टोकॅमॅक भट्टीची निर्मिती केली आहे. यात अब्जावधी अंश सेल्सियस तापमान मिळविण्यास शास्त्रज्ञांना यश मिळाले व अणूंचे संमीलन घडवून प्लाझ्मा निर्माण केला. पण त्या तापमानाला पकडून ठेवणारे पदार्थ नसल्याने त्यातून ऊर्जा बाहेर काढणे शक्य नव्हते; पण कालांतराने शास्त्रज्ञांनी सुपरकंडक्टरच्या सहाय्याने चुंबकीय क्षेत्र निर्माण करून प्लाझ्मा काही काळ पकडून ठेवण्यास यश मिळविले; पण ती बाहेर पडणारी ऊर्जा मात्र नगण्य होती.

नुकताच न्युक्लिअर फ्युजन प्रयोगांच्या साखळीमध्ये व शर्यतीत अमेरिकन शास्त्रज्ञांना मोठेच यश मिळाले आहे. यात भौतिक शास्त्रज्ञांनी अनेक दशकांपासून तंत्रज्ञानाचा पाठपुरावा केला आहे. कारण ते स्वच्छ व अमर्याद अशा ऊर्जेचे लक्ष्य ठेवत आहेत. यामध्ये जास्त ऊर्जा निर्माण करण्याचे ध्येय साध्य झाल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. ही वाढीव ऊर्जा नगण्य असली तरी ती प्रोत्साहित करणारी असून खऱ्या अर्थाने घराघरापर्यंत ही ऊर्जा नेण्यासाठी संशोधकांना निश्चितच कष्ट घ्यावे लागणार आहेत. हा प्रयोग नुकताच कॅलिफोर्नियातील 'लॉरेन्स लिव्हरमोर नॅशनल लॅबोरेटरी' येथील 'नॅशनल इग्निशन फॅसिलिटी'मध्ये यशस्वीपणे करण्यात आला. हा एक ऐतिहासिक क्षण असून गेली साठ वर्षे शास्त्रज्ञ या ऊर्जेसाठी प्रयत्नशील आहेत. हे अगदी अणुभंजनच्याविरुद्ध असून यात जड अणू न्यूट्रॉनच्या माऱ्याने विभक्त होतात.

अणुभंजन किंवा विखंडन हे सध्या अणुऊर्जा केंद्रामध्ये वापरले जाणारे तंत्रज्ञान आहे. परंतु या प्रक्रियेमुळे भरपूर किरणोत्सारी कचरादेखील निर्माण होतो. ज्यातून दीर्घकाळ भेदक किरणे बाहेर पडतात. हे निश्चितच धोकादायक असून त्याचा संरक्षित साठा करून ठेवणे आवश्यक असते. अणुसंमीलन प्रक्रियेतून निर्माण होणारी ऊर्जा मोठ्या प्रमाणात असून त्यातून निर्माण होणारा किरणोत्सारी कचरादेखील आपत्कालीन असतो आणि महत्त्वाचे म्हणजे या प्रक्रियेमुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जन होत नाही. त्यामुळे हवामान बदलाला हातभार लागत नाही; पण यामध्ये एक आव्हान आहे की अणूंना सक्तीने एकत्र ठेवण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात उच्च तापमान व दाबाची आवश्यकता असते.

# लोकशाही लोकांची होण्यासाठी..

लोकांनी, लोकांसाठी चालवलेले लोकांचे राज्य ही लोकशाहीची व्याख्या बदलत जाऊन ती मूठभरांची व्यवस्था होऊ पाहते आहे. या बदलापासून देशाला वाचवणे म्हणजेच पर्यायाने जगाला वाचवणे.. ते कसे शक्य आहे? २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल लागल्यापासून सुरू झालेला महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष अद्यापही थांबलेला नाही. अर्थात, यापूर्वीही महाराष्ट्रासहित अन्य राज्ये तसेच केंद्रातही असे प्रसंग अनेक वेळेस घडले आहेत. आपल्याकडे 'लोक'शाही हे अंतिम 'साध्य' असण्यापेक्षा सत्ता मिळविण्याचे ते एक साधन झाले आहे. कालपरत्वे वैयक्तिक स्वार्थ आणि काही अंशी विचारसरणीचा अतिरेकी प्रभाव या दोन प्रमुख बाबींमुळे लोकशाही क्षीण होत चालली आहे, हे सत्य नाकारून चालणार नाही. वैयक्तिक स्वार्थ हा प्रामुख्याने अर्थार्जनाच्या वाटेने जाणारा असल्याने लोकशाही संस्था या भांडवलशाहीच्या बटीक बनत चालल्या आहेत. अर्थशास्त्रासाठीचे नोबेल पारितोषिक विजेते जोसेफ स्टिग्लीट्झ सध्याच्या लोकशाहीची सुधारित व्याख्या करताना म्हणतात, सध्याच्या काळात लोकशाही म्हणजे १ टक्का लोकांचे, १ टक्का लोकांकडून चालवले जाणारे आणि १ टक्का लोकांसाठी चालवले जाणारे राज्य. १ टक्का हा धनवान लोकांचा समूह अभिप्रेत आहे. सन २०१८ मध्ये राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीतील धन, बाहुबलता व प्रसारमाध्यमे यांचा गैरवापर कसा थांबवता किंवा कमी करता येईल, यासाठी एक कार्यशाळा मुंबईमध्ये घेतली होती. मी त्या कार्यशाळेत जोपर्यंत संपूर्ण लोकशाहीला भांडवलशाहीच्या विळख्यातून बाहेर काढायचा प्रयत्न होत नाही तोपर्यंत निवडणुकांमध्ये धनसंपत्तीचा गैरवापर कमी करण्याचे प्रयत्न म्हणजे सूर्याला दिवा दाखवण्यासारखे आहे हे स्पष्ट केले. अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाने त्रयस्थ व स्वायत्त संस्था म्हणून देशाला नवी दिशा द्यावी असे सुचविले.

लोकशाहीचे आरोग्य सुदृढ करावयाचे झाले तर त्यासाठी काय केले पाहिजे, हा मुद्दा देशाच्या आणि जगाच्या अजेंड्यावर आला पाहिजे. तसा तो बऱ्यापैकी दुर्लक्षिला गेला आहे हे मान्य करावे लागेल. आज जगापुढे अगणित समस्या आ वासून उभ्या असल्या, तरी त्या सर्वांवर समर्पक तोडगे काढून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जी सक्षम व्यवस्था जागतिक, तसेच देश पातळीवर असावी लागते, ती कमकुवत असेल तर मग सर्वच भरकटत जाईल यात शंका नाही. जग लोकशाही व्यवस्थेकडे गेले तरच समस्या सुटण्याचा मार्ग दिसून येतो. लोकशाहीचे मूल्यमापन करणाऱ्या अनेक संस्था आहेत, त्यापैकी व्ही-डेम इन्स्टिट्यूटने जागतिक पातळीवर सर्वत्र लोकशाही मूल्यांची अधोगती होत असल्याचे अधोरेखित केले आहे. 'द इकॉनॉमिक्स' या लंडनस्थित प्रथितयश नियतकालिकाचे इकॉनॉमिक्स इंटेलिजन्स युनिट २००६ पासून दरवर्षी जागतिक लोकशाहीचे मूल्यमापन करून लोकशाही सुदृढतेचा निर्देशांक अभ्यासपूर्ण प्रक्रियेतून जाहीर करते. २०२१ च्या त्यांच्या अभ्यासानुसार जगातील फक्त ६.४ टक्के लोक हे पूर्ण लोकशाही व्यवस्थेत असून ३९.३ टक्के लोकसंख्या दोषपूर्ण लोकशाही, तर १७.२ टक्के लोकसंख्या मिश्र लोकशाही व ३७.१ टक्के लोकसंख्या ही हुकूमशाही व्यवस्थेमध्ये आजही वावरत आहे. अमेरिका व भारत हे दोषपूर्ण लोकशाही व्यवस्थेत असल्याचा त्यांचा निष्कर्ष आहे. त्यांचे आणखी एक निरीक्षण असेही आहे की, लोकशाही उत्तरोत्तर क्षीण होऊ लागली आहे.जगातील लोकशाही भक्कम करावयाची झाल्यास जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था म्हणून भारताने पुढाकार घेणे आवश्यक ठरते. अर्थात त्यासाठी भारताने प्रथम स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे. त्याबाबत काय करावे लागेल यावर मला जे वाटते ते पुढे नमूद करीत आहे.प्रथमतः लोकप्रतिनिधी निवडणे ही मतदारांची इच्छा असते. लोकशाही मूल्ये व संविधानाच्या संरचनेप्रमाणे राजकीय पक्ष त्यामानाने गौण असतो. खरे तर संविधान लागू झाल्यापासून सुरुवातीची ४५ वर्षे 'राजकीय पक्ष' ही संकल्पना संविधानात १९८५ मध्ये दहावे परिशिष्ट अंतर्भूत करण्यापर्यंत नव्हती. तथापि, राजकीय पक्षांमध्ये लोकशाही मूल्ये पायदळी तडवून 'आयाराम गयाराम'ची संस्कृती निर्माण झाली. त्यावर दहावे परिशिष्ट रामबाण उपाय म्हणून अंतर्भूत करण्यात आले. त्याचे परिणाम चांगले दिसून आले असले तरी तो रामबाण



उपाय नव्हताच, हे आता स्पष्ट झाले आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढावयाचा असेल तर निवडणुकीत पंजीकृत पक्षाने ज्या उमेदवाराला एबी फॉर्म दिला आहे तो उमेदवार निवडून आला तर तो त्याचा कार्यकाल संपेपर्यंत किंवा पक्ष त्याचे सदस्यत्व रद्द करत नाही तोपर्यंत तो एबी फॉर्म दिलेल्या पक्षातच असेल, अशी तरतूद संविधानात करण्यात यावी. याबाबत त्याचे सदस्यत्व रद्द करणे वा न करणे, याचा निर्णय पक्षांतर्गत निवडणूक पद्धतीने निवडून आलेल्या पक्षप्रमुखांच्या स्वाक्षरीनेच ठरविण्याची तरतूद असावी. ज्या पक्षाने एबी फॉर्म दिलेला आहे त्याच्या पक्षप्रमुखाने विधानसभाध्यक्ष किंवा लोकसभाध्यक्ष यांना संबंधित सदस्याने पक्षविरोधी भूमिका घेतली आहे हे लिखित स्वरूपात कळविले तर त्याची पोच हीच त्या सदस्याची सदस्यत्व रद्द होण्याची अंतिम प्रक्रिया असावी.दुसरे म्हणजे प्रातिनिधिक लोकशाहीच्या सुदृढतेकरिता आणखी एक कलम संविधानात अंतर्भूत करणे गरजेचे आहे. विधान मंडळ किंवा संसदेत अविश्वासाचा किंवा विश्वासदर्शक प्रस्तावकाळात लोकप्रतिनिधींना त्यांची मते मांडण्याची पक्षविरहित मुभा असावी. दुसऱ्या शब्दांत व्हिप नावाचा प्रकार केवळ अविश्वास/विश्वासदर्शक प्रस्तावावरच असावा आणि अन्य बाबतींत सदस्याने पक्षविरोधी मत नोंदविले तरी ते सदस्य अपात्र ठरणार नाहीत. म्हणजेच ते पक्षाचा नव्हे तर लोकभावनांचा आदर ठेवू शकतील. तिसरी बाब म्हणजे, देशाने संपूर्ण लोकशाहीकडे वाटचाल करण्याकरिता निवडणुकीपूर्वी पक्ष जे जाहीरनामे प्रसिद्ध करतात, त्यांस वैधानिक दर्जा देणे गरजेचे आहे. संविधानातील प्रकरण चारमधील निर्देशक तत्त्वाप्रमाणे देश चालावा, असे अभिप्रेत आहे. ते समोर ठेवून जाहीरनाम्याचे एक वैधानिक स्वरूप (फॉरमॅट) ठरविण्यात येऊन प्रत्येक पक्ष सेवा करण्यासाठी निवडून आला तर (सत्तेत नव्हे) काय करेल, याचा संपूर्ण लेखाजोखा व त्याची अंमलबजावणी करण्याचे, पाच वर्षांच्या मर्यादेचे वेळापत्रक देण्याचे बंधन करण्यात यावे; तसेच त्यासाठी निधी कसा उभारला जाईल, हे ढोबळमानाने ठरवण्यात यावे. या जाहीरनाम्याव्यतिरिक्त मोठे धोरणात्मक निर्णय घ्यायचे असतील तर त्यास संसद वा विधान मंडळाचे दोनतृतीयांश बहुमत असल्याशिवाय घेण्यात येऊ नयेत, अशी तरतूद असावी. त्यावर देशांतर्गत चर्चा होऊन यथावकाश निर्णय व्हावा.

चौथी बाब म्हणजे देशातील भ्रष्टाचार निपटून काढावयाचा असेल तर लोकपाल, लाचलुचपत प्रतिबंध इत्यादी घटना घडून गेल्यानंतरच्या उपाययोजनांबरोबरच मुळात भ्रष्टाचाराची जननी म्हणजे निवडणूक खर्च यावर पूर्णपणे मर्यादा आणावी. भारतास आणि जगास खरोखरच निकोप लोकशाही पाहिजे असेल तर जे आर्थिक व सामाजिकदृष्ट्या क्षीण आहेत त्यांचा सहभाग हा त्यांच्या संख्येच्या सापेक्ष व्हायचा असेल तर निवडणुकांसाठी अजिबात खर्च होऊ नये, ही प्राथमिक गरज आहे. त्याच वेळेस निवडणुकादरम्यान खर्च केलेला पैसा पुन्हा राजकारणातून वसूल करणे किंवा इतर धनदांडग्यांकडून देणगी स्वरूपातील मिळालेल्या पैशाच्या बदल्यात त्यांना धार्जिणे असलेले निर्णय घेण्याची बांधिलकी येणे त्यामुळे सर्वदूर भ्रष्टाचाराचा उगम होतो. हे टाळण्यासाठी अशा निधीचा निवडणुकीदरम्यान खर्चास मज्जाव हा एकमेव जालीम उपाय आहे. वरील चार सांविधानिक तरतुदींबरोबरच लोकशाहीशी सुसंगत नसलेल्या बाबी पूर्णपणे काढणे हा मुद्दाही महत्त्वाचा आहे. याचा आढावा घेण्यासाठी देशभर लोकांकडून मते मागवून विचार व्हावा. अशाच एका लोकशाही तत्त्वाच्या विरोधात संविधानात असलेली तरतूद म्हणजे राज्यपाल हे पद! लोकशाही ही जनतेच्या लोकप्रतिनिधींमार्फत चालवली जाते. त्यांना सहाय्यभूत ठरेल अशी नोकरशाहीदेखील लोकशाहीला पूरक ठरावी आणि यासाठी ती निकोप असावी असे तत्त्व अंतर्भूत असते. आपल्या संविधानाचा परामर्श घेतला तर राष्ट्रपतींपासून ग्रामपंचायत किंवा नगरपालिकांच्या संस्थांपर्यंत निवडणूक प्रक्रियेतून, मग ती प्रत्यक्ष निवडणूक असेल किंवा अप्रत्यक्ष असेल, लोकप्रतिनिधी निवडले जातात व तीच शासनव्यवस्था होय. नोकरशाही ही लोकशाहीला पूरक तसेच तटस्थ असावी यासाठी संविधानातील प्रकरण १४ नुसार नोकरशाहीतील नियुक्त्या किंवा त्यांना सेवेतून काढून टाकणे याची एक तटस्थ व राजकारणविरहित व्यवस्था निर्माण केलेली आहे व त्यानुसार संघ व राज्य लोकसेवा आयोग आणि अन्य स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याची तरतूद आहे, जेणेकरून नोकरशाही राजकीय दबावापलीकडे राहू शकेल.

या सर्व लोकशाही व्यवस्थेत राज्यपाल असे एक पद आहे की जे ना लोकशाही प्रक्रियेच्या निवडणुका माध्यमातून येते अथवा तटस्थ यंत्रणेकडून निवडले जाते. राज्यपालांची नियुक्ती किंवा त्या पदावरील व्यक्तीला हटवणे, ही पूर्णपणे लोकशाहीशी विसंगत राजकीय प्रक्रिया आहे. त्यामुळे हे पद लोकशाही संकल्पनेत अजिबात अंतर्भूत होत नाही. अशा लोकशाही प्रक्रियेच्या परिघाबाहेरील पदावरील व्यक्तीस राज्याचा प्रमुख करणे, ही बाब लोकशाहीमध्ये हास्यास्पद आहे. हे पद सांविधानिक बदल करून तातडीने रद्द केले पाहिजे. अर्थात, या पदाकडे जी कर्तव्ये सोपविलेली आहेत, त्यांसाठी स्वतंत्र लोकशाही व्यवस्था अपेक्षित आहे. एक तर राज्याचे प्रमुख हे लोकशाही प्रक्रियेतून आलेले मुख्यमंत्री हेच ठरविता येतील. दुसरे म्हणजे शिक्षण क्षेत्रातील कुलगुरूंच्या नेमणुका किंवा तत्सम कामे लोकशाही प्रक्रियेतून आलेले मंत्रिमंडळ हाताळू शकेल. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती मंत्रिमंडळाला शपथ देऊ शकतात, त्यासाठी राज्यपालांची आवश्यकता नाही. केंद्र आणि राज्यांमध्ये दुवा असणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रत्येक राज्यात सध्या राज्यपालाचे सचिवालय असते ते राष्ट्रपतींचे सचिवालय म्हणून घोषित करता येऊ शकेल.

### प्रेमात ब्रेकअप ! संतापलेल्या

ललितकडे त्या मुलीच्या भावाचा कुत्रा सांभाळण्यासाठी होता. शनिवारी रात्रीच्या सुमारास ती मुलगी आणि आदित्य हे दोघे हा कुत्रा घेण्यासाठी खडेगोलवली परिसरात आले. यावेळी ललितचा ती मुलगी आणि आदित्य सोबत वाद झाला. हत्या केल्यानंतर आरोपी साथीदारांसह फरार या वादातून ललितने आपल्या साथीदारांसह आदित्यवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात आदित्यचा मृत्यू झाला. या घटनेनंतर ललित आपल्या साथीदारांसह पसार झाला होता. कोळशेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल करत ललित उज्जैनकर व त्याच्या साथीदारांचा शोध सुरू केला. ललितचा एक साथीदार अवघ्या काही तासातच पोलिसांच्या हाती लागला. त्याने दिलेल्या माहितीनुसार ललित व त्याचे उर्वरित साथीदार हे मध्य प्रदेश येथे पळून गेले होते. अवघ्या 24 तासात पोलिसांनी ललितसह त्याचे फरार साथीदार नकुल भोईटे ,राहुल चव्हाण ,सागर गांगुर्डे यांना बेड्या ठोकल्या आहेत.

### नायलॉन मांजा

तहसिलदार, नगरपालिका मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांनी परराज्यातून येणाऱ्या नायलॉन मांजावर आळा घालण्यासाठी पोलिस चेकपास्ट ॲक्टीव्ह करण्याचे तसेच सायबर सेलने ऑनलाईन मांजा विक्रीवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. ज्या भागात पतंग जास्त प्रमाणात उडविल्या जाते, अशा भागात विशेक्ष लक्ष ठेवण्याचे तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी यांनी नायलॉन मांजाविरोधात सामाजिक माध्यमांद्वारे जनजागृती करण्याचे त्यांनी सांगितले. 'मी पतंग उडवितांना नायलॉन मांजा वापरणार नाही, आणि इतर कोणालाही नायलॉन मांजा वापरू देणार नाही', या आशयाची प्रतिज्ञा सर्व शासकीय व खाजगी शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मकरसंक्रातपर्यंत रोज घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे. यासोबत पालकांनो, आपला पाल्य पतंग उडवतांना कोणता मांजा वापरतो आहे, याकडे लक्ष ठेवण्याचे व नायलॉन मांजा वापरल्यास कारवाई होऊ शकते, अशी समज आपल्या पाल्यांना देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी पालकांना केले आहे.

तक्रारीसाठी नियंत्रण कक्षनायलॉन मांजा बाबत तक्रार करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापण्यात आला आहे. नागरिकांना 0712-2562668 किंवा टोल फ्री क्रमांक 1077 यावर तसेच जवळच्या महानगरपालिका झोन कार्यालय, तहसिल कार्यालय, नगरपिरषद, नगरपंचायत, पंचायत समिती कार्यालय येथे देखील नायलॉन मांजाबाबत तक्रारी दाखल करता येतील.

### दाऊद इब्राहिम टोळीला गुटखा कारखान्यासाठी मदत,

आणि सहआरोपी असलेल्या रसिकलाल धारिवाल यांच्यात आर्थिक वाद झाल्याचा दावा तक्रारदाराने केला होता. दरम्यान ट्रायलच्या कालावधीत सहआरोपी धारिवाल यांचा मृत्यू झाला. गुटखा इंडस्ट्रीतील किंग व्यावसाईकांमध्ये वाद दाऊद इब्राइम टोळीने 2002 मध्ये पाकिस्तानमध्ये गुटखा व्यवसाय सुरू करण्यासाठी आरोपींची मदत घेतली होती. धारीवाल हे आरएमडी गुटखा बनवायचे तर जोशींच्या कंपनीचे नाव गोवा गुटखा होते. गुटखा उद्योगातील धारिवाल आणि जोशी ही दोन मोठी नावे होती, या दोघांनाही गुटखा उद्योगात किंग मानले जात होते. सुरुवातीला जगदीश जोशी आरएमडी कंपनीत मॅनेजर म्हणून काम करत होता. मात्र कालांतराने त्याने स्वतःची गोवा नावाची गुटखा कंपनी काढली. त्यानंतर दोघांमध्ये आर्थिक व्यवहारावरून वाद झाला होता. दोघांमधील वादाची माहिती दाऊदला समजली. यावर तोडगा काढण्यासाठी जोशीकडून गुटखा बनवण्याचे तंत्रज्ञान आणि माहिती दाऊद टोळीने घेतली. यानंतर मुंबईतून 15 गुटखा मॅन्युफॅक्चरिंग मशिन्स आणि पाऊच तयार करणारी मशिन्स दुबाईला आणि तिथून कराचीत पाठवण्यात आली होती.

### पुणे: महिलेचा पाठलाग करून

आहे. याबाबत कोरेगाव पार्क भागातील एका ३२ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिलेचा गेल्या महिन्यात १ डिसेंबरपासून पाठलाग सुरू होता. आपला कोणीतरी पाठलाग करते, याचा संशय महिलेला होता. महिलेचे छायाचित्र काढून कोणाला तरी पाठविण्यात आल्याचा संशय महिलेला होता. समाजमाध्यमावर आपले छायाचित्र प्रसारित करुन गैरवापर होण्याची भीती महिलेला वाटत होती. त्यामुळे महिलेने पुणे पोलिसांच्या महिला सहाय कक्षात तक्रार दिली होती. महिलेने गुन्हे शाखेतील सहायक पोलीस आयुक्त नारायण शिरगावकर यांची भेट घेतली होती. त्यानंतर साध्या वेशातील पोलिसांनी पाळत ठेवणाऱ्यांचा शोध घ्यायला सुरुवात केली. दोन दिवसांपूर्वी महिला कोरेगाव पार्क भागातील एका हाॅटेलमध्ये गेली होती. त्या वेळी परदेशी आणि बिरादार महिलेवर पाळत ठेवून थांबले होते. दोघे जण तिचे लांबून तिचे छायाचित्र काढत होते. साध्या वेशातील पोलिसांनी दोघांच्या संशयास्पद हालचाली टिपल्या. परदेशी आणि बिरदार यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत दोघे जण एका गुप्तचर संस्थेसाठी काम करत असल्याचे उघड झाले. महिलेचा पाठलाग करुन तिची महिती काढण्याचे काम कोणी दिले, याची माहिती दोघांनी पोलिसांना दिली नसून सहायक पोलीस आयुक्त नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

### विवाहित महिलेशी अश्लिल

आल्यावर पोलिसांच्या तावडीतून आरोपीला खेचून आणत स्थानिक भाजप कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी या कर्मचाऱ्याला चांगलाच चोप दिला. काल संध्याकाळी पोलीस आरोपीला घेऊन पोलीस स्टेशनला आल्यावर पोलिसांच्या तावडीतून आरोपीला खेचून भाजप कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्याची चांगलीच 'धुलाई' केली आणि त्याचे कपडे फाडले असल्याचे नागरिकांनी सांगितले.अशी घडली घटना फिर्यादी पती आणि पत्नी काम करत असलेल्या कंपनीमध्येच सुपरवायझर म्हणून कामाला असलेल्या रघुवेंद्र उपाध्याय याने पीडित महिलेला लग्न करण्याची गळ घातली. मात्र, तिने माझे लग्न झाले असून दोन मुले असल्याचे सांगून नकार दिला. काही दिवस हे प्रकरण बंद होते. मात्र, आरोपीने महिलेसोबत मोबाईलवर बोलणे सुरू केले. रघुवेंद्र तिला व्हिडिओ कॉल करून धमकी देत होता. व्हिडीओ कॉल केला नाही तर तुझ्या पतीला जीवे मारेन म्हणून धमकी देत होता.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन, जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ६७७ /२०२२-२३

दिनांक : ०५/०१/२०२२

// जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाण | वृक्षाचे नाव | संख्या | मुळासहित काढणे | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रा.म.क्र.०८ स्व. आनंद दिघे चौक ते माशाचा पाडा शाळा पर्यंत पायावाटा रस्ता क्रॉकीटीकरण करण्याचे काम बांधकाम विभागामार्फत सुरु आहे **मा.कार्यकारी अभियंता(सा बां)यांचे दि.२९/११/२०२२ प्राप्त दि.०९/१२/२०२२ रोजीचे पत्र** | पिंपळ | ०२ | मुळासहित काढणे | विकासकामात बाधित |
| | | जंगली झाडे | ०२ | | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

जा.क्र मनपा/जनसंपर्क/४९५/२०२२-२३
दिनांक ०५/०१/२०२२

सही/-
(कविता बोरकर)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# राज्याच्या शाश्वत विकासातही पत्रकारांचे महत्त्वपूर्ण योगदान : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : पत्रकारांचे काम केवळ बातम्या देण्यापुरते मर्यादित नसून राज्याच्या शाश्वत विकासातही पत्रकारांची महत्त्वाची भूमिका असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.आज पत्रकार दिनानिमित्त मुंबई येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे अप्रतिम मीडिया न्युज नेटवर्कने आयोजित केलेल्या चौथा स्तंभ राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार, मुख्यमंत्री कार्यालयाच्या पायाभूत सुविधा कक्षाचे महासंचालक राधेश्याम मोपलवार, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील, मंत्रालय विधिमंडळ पत्रकार संघाचे अध्यक्ष मंदार पारकर, सिने अभिनेते आणि दिग्दर्शक मंगेश देसाई, विवेक देशपांडे, रंजीत कक्कड आणि अप्रतिम मीडियाचे संचालक डॉ. अनिल फळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, बदलत्या तंत्रज्ञानाची नोंद घेऊन पत्रकारांनी वाटचाल केली पाहिजे. राज्य शासनही पत्रकारांसाठी वैद्यकीय सहायता योजना, अधिस्वीकृती योजना, पत्रकारांना निवृत्तीनंतर सन्मान अशा काही महत्त्वपूर्ण योजना राबविते. या योजनांमध्ये काही सुधारणा करण्याबाबत काही सूचना येत आहेत. लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या पत्रकारांच्या हितासाठी आवश्यक त्या सुधारणा या योजनांत जरूर करण्यात येतील, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पत्रकारांचे काम केवळ बातमी लिहिणे नाही तर राज्याच्या शाश्वत विकासासाठी सुद्धा त्यांचे योगदान महत्वाचे आहे. गेल्या सहा महिन्यातील राज्य शासनाचे काम माध्यमांनी पाहिले आहे. लोकाभिमुख




काम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्यातल्या ७५ वर्षाच्या ज्येष्ठांना मोफत एसटी प्रवास, समाजामध्ये दुर्लक्षित दिव्यांगांसाठी स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग, समृद्धी महामार्ग, विदर्भासाठी नागपूर अधिवेशनात विविध निर्णय राज्य शासनाने घेतले. माध्यमांनी ते सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले, असे त्यांनी सांगितले.माध्यम क्षेत्रात गेल्या तीन - साडे तीन दशकात खूप बदल झाले आहेत, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, पत्रकारांनी या बदलाची नोंद घेतली पाहिजे. अर्थात या बदलांमुळे पत्रकारांचे महत्व कमी होणार नसल्याचेही त्यांनी नमूद केले.मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात वृत्तपत्रांनी मोठी भूमिका बजावली. आजही नागरिकांना, वाचकांना खऱ्या अर्थाने सज्ञान करणे आणि लोकशिक्षणाची भूमिका माध्यमांनी पार पाडण्याची गरज आहे. आपल्या समाजापुढील अंमली पदार्थांचा वाढता वापर, नक्षलवाद, दहशतवाद, रोजगार, बदललेल्या कुटुंब व्यवस्था, बाजारू चंगळवाद या समस्यांचा वेध घेऊन माध्यमांनी वस्तुनिष्ठ आणि मार्गदर्शक अशी भूमिका मांडली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी गडचिरोली येथील नक्षलवादाचा बिमोड करण्याची राज्य शासनाची भूमिका असून तेथील नागरिकांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेतले जात असल्याचे सांगितले.यावेळी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग उभारणीत मोलाचा वाटा असणारे श्री. मोपलवार, मनरेगा मध्ये विविध सुधारणा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करणारे अतिरिक्त मुख्य सचिव श्री. नंदकुमार यांचा विशेष सन्मान मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.अप्रतिम मीडियाच्या वतीने प्रकाश कथले (वर्धा), हेमंत जोशी आणि योगेश त्रिवेदी (मुंबई) यांना चौथा स्तंभ राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याशिवाय, माध्यम उद्योजकता व संपादकीय नेतृत्व, पर्यावरण वृत्त, वने व इको टुरिझम वृत्त, टीव्ही न्यूज चॅनेल टीम लीडर, विकास वृत्त, स्थानिक पर्यटन वृत्त, उद्योग/व्यापार वृत्त, कला-संस्कृती, कृषी, शैक्षणिक, आरोग्य, साहित्य, ग्रामीण विकास, सहकार अशा विविध विभागात पत्रकारांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते 'अप्रतिम महावक्ता' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

## राज्यपालांच्या हस्ते समाजसेवा, शिक्षण क्षेत्रातील योगदानाकरिता पुरस्कार प्रदान

**मुंबई :** समाजसेवा, संस्कृती व शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या उत्तर भारतीय महासंघ या संस्थेचा २८ वा वर्धापन दिन तसेच संस्थेतर्फे देण्यात येणारे 'साहित्य गंगा' पुरस्कार राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज राजभवन येथे प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. योगेश दुबे, माजी आमदार राज पुरोहित व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. राज्यपालांच्या हस्ते ओ. पी. व्यास, पंडित कालीनाथ मिश्र, गिरीश मिश्रा, प्रशांत मलिक, के. पी. पांडे, कमलेश दुबे, आर. पी. व्यास, शैलेंद्र भरती यांसह ३५ व्यक्तींना 'साहित्य गंगा' पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## तृतीयपंथियाला बेदम मारहाण करत सामूहिक अत्याचार

**भिवंडी :** भिवंडीमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. शहरातील शांतीनगर पोलीस ठाणे हद्दीतील आझादनगर एका खोलीत नेऊन बेदम मारहाण करीत दोघाजणांनी १९ वर्षीय तृतीय पंथियावर सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना भिवंडी शहरातील आझादनगर परिसरात घडली.
या प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात दोघाजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तहाल खान (वय२३) आणि शाहिद (वय २५) असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पीडिताने घडलेला प्रसंग घरच्यांना व गुरूला सांगितला. त्यानंतर शांतीनगर पोलीस ठाणे गाठून पीडिताने पोलिसांसमोर घडलेल्या प्रसंगाचे कथन करताच दोन्ही नराधमांविरोधात गुन्हा दाखल करून पोलीस पथकाने दोघांचा शोध सुरू केला आहे. दरम्यान या घटनेप्रकरणी न्याय मिळाला नाही तसेच आरोपीला लवकरात लवकर अटक झाली नाही, तर किन्नर संघटनेच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## गोरेगाव - मुलुंड लिंक रोडवरील ५५ बेकायदा बांधकामे जमीनदोस्त



**मुलुंड (प्रतिनिधी):**भांडुप 'एस' विभागाच्या वतीने गोरेगाव - मुलुंड लिंक रोडच्या बांधकामात अडथळा ठरणारी ५५ बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. महापालिकेच्या सदर कारवाईनंतर जीएमएलआर योजनेच्या निर्माणाला गती येणार आहे. यावेळी प्रचंड पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोणत्याही विशेष अडथळ्याशिवाय ही अनधिकृत बांधकामे तोडण्यात आली आहेत.

गोरेगाव - मुलुंड लिंक रोड हा मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरात आकारात येत असलेला महत्वाकांक्षी प्रकल्प आकारात येत आहे. या रोडचे काम जोरात सुरू झाले आहे. दोनच दिवसांपूर्वी सुदर्शन हॉटेल ते तूळशेत पाडा पर्यंतच्या अर्धा किलोमीटर अंतरावरील भांडुप 'एस' वार्डातील ५० हून अधिक बेकायदा बांधकामांवर बुलडोझर चालविण्यात आला. या बेकायदा बांधकामांवर कारवाई केल्यानंतर रस्त्याची रुंदी ३० मीटरवरून ४५.७५ मीटरपर्यंत वाढली आहे. या कामासाठी २५ अधिकाऱ्यांची विशेष टीम या कामासाठी तैनात करण्यात आली होती. भांडुप एस वार्डच्या एका संबंधित अधिकाऱ्याने माहिती देताना सांगितले की, या कारवाईमुळे जीएमएलआर प्रकल्पाची अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.मुलुंड - गोरेगाव लिंक रोडसाठी ४.७५ किमी आणि १.६ किमी लांबीचा बोगदा बांधण्याचा निर्णय घेण्यात आला असून हा बोगदा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानापर्यंत जाणार आहे. याशिवाय वाहतूक सुलभ होण्यासाठी २ किमी लांबीचा रस्ता देखील तयार करण्यात येणार आहे, जेणेकरून लहान वाहनचालकांना अडचणीचा सामना करावा लागणार नाही आहे.

## पंजाबच्या तीन शार्प शूटर्सना कल्याणमध्ये अटक; तिघेही पंजाबमधील खत्री गँगचे सदस्य




पंजाबमधील तीन कुख्यात शार्प शूटर्सना कल्याणमधून ताब्यात घेण्यात आलंय. पंजाब अँटी गँगस्टर टास्क फोर्स, मुंबई एटीएस आणि खडकपाडा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत शिवम सिंह, गुरुमुख सिंह, अमनदीप कुमार यांना ताब्यात घेतलं आहे. हे तिघे शार्प शूटर पंजाबमध्ये हत्या करून मोहने परिसरात लपून बसले होते. हे तिघेही गुंड पंजाबमधील खत्री गँगचे सदस्य असल्याची माहिती मिळत आहे. पंजाबमध्ये हत्या करुन तिनही शार्प शूटर्सनी तिथून पोबारा केला होता. त्यानंतर त्यांनी कल्याण गाठलं आणि कल्याणमधील मोहने परिसरात लपून बसले. तेव्हापासूनच पोलीस त्यांच्या शोधात होते. अशातच खबरींकडून कल्याणमधील एका इमारतीत कुख्यात गुंड लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तेव्हापासूनच पंजाब अँटी गँगस्टर टास्क फोर्सचे अधिकारी परिसराची रेकी करत होते. कल्याण पश्चिम येथील मोहने यादव नगर परिसरातील एका इमारतीत काही कुख्यात गुंड असल्याची माहिती पंजाब पोलिसांकडे होती. गेल्या दोन दिवसांपासून पंजाब अँटी गँगस्टर टास्क फोर्सचे अधिकारी कर्मचारी या परिसराची रेकी करत होते. आज पहाटे चार वाजण्याच्या सुमारास या टास्क फोर्स, मुंबई एटीएस आणि खडकपाडा पोलिसांच्या मदतीनं एका इमारतीत लपून बसलेल्या तीन शार्प शूटर्सना तब्येत घेतलं आहे. या कारवाईत खडकपाडा पोलिसांची भूमिका महत्त्वाची होती. हे तिघे पंजाबमध्ये झालेल्या मख्खन सिंह हत्याकांडात फरार होते. या हत्याकांडात पंजाब पोलिसांनी मनदीप सिंह या आरोपीला अटक केली होती. या आरोपींच्या चौकशी दरम्यान शिवम सिंह, गुरुमुख सिंह, अमनदिप कुमार या तिघांची नावं सांगितली आहेत. या तिघांना देखील आज सकाळच्या सुमारास अटक करण्यात आली आहे. या तिघांना कल्याण न्यायालयात हजर करून घेण्यात येईल आणि ट्रानझिक रिमांड घेत पंजाब पोलीस या तिघांना घेऊन पंजाबला रवाना होणार आहेत.

## वरळी येथील अविघ्न टॉवर मधील लिफ्ट ट्रॉली कोसळली; 2 कामगारांचा मृत्यू



मुंबई : वरळी येथे ७५ मजली 'अविघ्न टॉवरमध्ये सोमवारी दुपारच्या सुमारास 'लिफ्ट ट्रॉली' अचानक कोसळून झालेल्या दुर्घटनेत २ कामगारांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वरळी, बी.जी.खेर मार्ग, प्रेम नगर येथे निर्माणाधिन ७५ मजली 'अविघ्न टॉवर' मध्ये सोमवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास इमारतीच्या काचा स्वच्छ करण्यासाठी कामगारांनी वापरलेली 'ट्रॉली लिफ्ट' अचानक कोसळली. लिफ्ट ट्रॉलीवर काम करत असलेले दोघे जण सोळाव्या मजल्यावरून लिफ्टसह खाली कोसळले. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी दोघांनाही तात्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु, उपचारदर सुरू असताना दोघांचाही मृत्यू झाला. इमारतीच्या आवारात लिफ्ट कोसळल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. अवघ्या पाच दिवसांत लिफ्ट दुर्घटनेची ही दुसरी घटना आहे. त्यामुळे इमारतींमधील विविध प्रकारच्या लिफ्टच्या सुरक्षिततेचा विषय ऐरणीवर आला आहे. या कामगारांचे नाव अद्याप अस्पष्ट असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.
विक्रोळीतही लिफ्ट कोसळली
दरम्यान, विक्रोळी येथे श्री सिद्धिविनायक को-ऑपरेटिव्ह या सोसायटीची 23 माळ्यांची इमारत आहे. या सोसायटीच्या पार्किंग लिफ्टचे काम सुरू होते. काम सुरू असतानाच पार्किंग लिफ्टचा ढाचा 23 व्या मजल्यावरून खाली कोसळला. यावेळी चार कामगार लिफ्टचे काम करत होते. त्यावेळी यातील एका कामगाराचा मृत्यू झाला होता. तर दोघांना बाहेर काढण्यात यश आले होते.

## नव्या वर्षात वीजग्राहकांना बसणार मोठा शॉक, दरवाढीची शक्यता



नव्या वर्षात राज्यातील ग्राहकांना वीज दरवाढीचा मोठा शॉक बसणार आहे. महावितरण कंपनीने सरासरी २ रुपये ३५ पैसे प्रति युनिट वीज दरवाढीचा प्रस्ताव राज्य वीज नियामक आयोगापुढे सादर करण्याची तयारी करण्यात आली आहे. या याचिकेवर निर्णय होणे बाकी आहे. येत्या काही दिवसांमध्ये राज्याच्या विविध भागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे सत्ताधाऱ्यांकडून या प्रस्तावावर निर्णय लांबण्याची शक्यता आहे.
मागील काळात महावितरण कंपनीने सरासरी प्रति युनिट १.0३, तर महापारेषण कंपनीने ३२ पैसे असा एकूण १.३५ रुपये प्रति युनिट दरवाढीचा प्रस्ताव आधीच सादर करण्यात आला. तर अदानी इलेक्ट्रिसिटीकडून विदेशी कोळसा आयात करून वीजपुरवठा केल्याच्या मोबदल्यात २२ हजार ५00 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने हे पैसे इंधन अधिभाराच्या माध्यमातून वसूल करण्याचे निर्देश दिले होते.
महावितरणकडून बहुवर्षीय दरनिश्चिती विनियमानुसार तिसऱ्या वर्षात नोव्हेंबर अखेरपर्यंत वीजदरासंदर्भात फेरआढावा घेण्यासाठी याचिका दाखल करण्यात येते. त्यानुसार महावितरण कंपनीकडून वीजदरवाढीचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. परंतु या निर्णयाला सामान्य नागरिकांकडून विरोध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्य वीजग्राहक संघटनेने आतापासूनच मोर्चेबांधणीला सुरूवात केली आहे. राज्यातील सर्व वीज ग्राहकांनी प्रचंड संख्येने सूचना व हरकती नोंदवून करावे, असे आवाहन वीज ग्राहक संघटनेचे प्रताप होगाडे यांनी यानिमित्ताने केले आहे.

## मुंबई : रिव्हॉल्वरचा धाक दाखवून अभिनेत्याचे अपहरण, गुन्हा दाखल



मुंबई : रिव्हॉल्वरचा धाक दाखवून २९ वर्षीय अभिनेत्याचे अपहरण करून २० लाखांची खंडणी मागितल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सुटका होताच या अभिनेत्याने ओशिवरा पोलिसांत तक्रार केली होती. त्यानंतर अपहरणकर्त्यांविरुद्ध खंडणीसाठी धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून, त्याचा पुढील तपास घाटकोपर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. वरिष्ठांच्या आदेशावरून या गुन्ह्यांचा घाटकोपर पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी समांतर तपास करत आहेत. मूळचा पोर्ट ब्लेअर येथील रहिवासी असलेला अनुशील अनुप चक्रवर्ती हा चित्रपट अभिनेता असून तो त्याच्या कुटुंबासह जोगेश्वरीतील ओशिवरा पार्क परिसरात राहतो. त्याने स्वतःच्या करिअरची सुरुवात झी कंपनीच्या एका म्युझिक व्हिडिओद्वारे केली होती. त्यानंतर त्याने 'गेम ऑफ स्टुपिड लव्हर' या चित्रपटाद्वारे पदार्पण केले होते. दोन दिवसांपूर्वी तो घाटकोपर येथून विक्रोळीतील पूर्व द्रुतगती मार्गावरून त्याच्या मोटरगाडीमधून जात होता. काही अंतर गेल्यानंतर त्याच्या मोटरगाडीच्या पुढे दुसरे वाहन आले. या वाहनातून उतरलेल्या अज्ञात व्यक्तीने रिव्हॉल्वरचा धाक दाखवून त्याच्याच मोटरगाडीमधून त्याचे अपहरण केले. त्याला एका निर्जनस्थळी नेऊन जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर त्याच्या आईला दूरध्वनी करून अपहरणकर्त्यांनी अनुशीलचे अपहरण झाल्याची माहिती दिली आणि त्याच्या सुटकेसाठी वीस लाख रुपयांची खंडणी मागितली. रक्कम न दिल्यास अनुशीलला सोडणार नाही, अशी धमकीच अपहरणकर्त्यांनी दिली होती. त्यामुळे त्याच्या आईला प्रचंड मानसिक धक्का बसला. रात्री उशिरा त्याला अपहरणकर्त्यांनी सोडून दिले. घरी आल्यानंतर त्याने दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवार, ७ जानेवारी रोजी ओशिवरा पोलीस ठाण्यात धाव घेतली होती. तेथे उपस्थित पोलिसांना घडलेला प्रकार सांगून त्याने अपहरणकर्त्यांविरुद्ध तक्रार केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी अपहरणकर्त्यांविरुद्ध खंडणीसह अपहरण आणि धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे. या गुन्ह्यांचा तपास घाटकोपर पोलिसांकडे सोपविण्यात आला असून त्याचा समांतर तपास गुन्हे शाखेचे अधिकारी करत आहेत.

## पुण्यात पुन्हा कोयता गँग ची दहशत, तळजाई टेकडीवर युवकावर चाकूने वार



पुणे : तळजाई टेकडी परिसरात वैमनस्यातून युवकावर चाकूने वार करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी चौघांच्या विरोधात सहकारनगर पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हर्षद नितीन खिलारे (वय १८, रा. खिलारे वस्ती, ढोले मळा, गुलटेकडी) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी सुयोग भोसले याच्यासह चौघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खिलारे आणि त्याचे मित्र तळजाई टेकडी परिसरात मोबाइलवर छायाचित्र काढत होते. त्या वेळी आरोपी भोसले आणि साथीदार तेथे आले. 'तू चिक्क्या भाईला शिव्या दिल्या का ? अशी विचारणा करून भोसलेने खिलारेवर चाकूने वार केले. खिलारेचा मित्र आतिश पाटोळे याने भांडणात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्याच्यावर चाकूने वार करण्यात आले.

## मुंबई: पस्तीस लाखांची रोख घेऊन पळालेल्या नोकराला अटक; ८० टक्के मुद्देमाल हस्तगत

सुमारे ३५ लाख रुपयांची रक्कम चोरी करुन पळून गेलेल्या पंकज सिंह नावाच्या नोकराला अवघ्या १२ तासांत अटक करण्यात पोलिसांना यश आले. कांदिवली पोलिसांच्या एका विशेष पथकाने कल्याणजवळील नाशिक महामार्गावर सापळा रचून मोठ्या शिताफीने आरोपीला अटक केली. त्याच्याकडून पोलिसांनी २७ लाख रुपयांची रोख हस्तगत केली. चोरीच्या याच गुन्ह्यांत तो सध्या पोलीस कोठडीत असल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरीच्या रोख रकमेबाबत संभ्रम असून मालकाच्या जबाबानुसार ३५ लाख रुपये चोरी झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. नोकराकडे २७ लाख रुपये सापडले आहेत. बॅगेत २७ लाख रुपये असल्याचा दावा नोकराने केला आहे. त्यामुळे या नोकरासह मालकाची पोलिसांकडून चौकशी होणार आहे. यातील तक्रारदार विकासक असून ते त्यांच्या कुटुंबियांसह कांदिवलीतील महावीरनगर परिसरात राहतात. त्यांनी एक भूखंड खरेदी केला होता. त्याचे पैसे देण्यासाठी त्यांनी नोकर पंकज



सिंह व चालकाला संबंधित व्यक्तीकडे पाठविले होते. यावेळी त्यांना एका बॅगेत ३५ लाख रुपये देण्यात आले होते. ही रक्कम दिल्यानंतर त्या व्यक्तीकडून काही कागदपत्रे घेऊन येण्यास सांगण्यात आले. ते दोघेही शुक्रवारी सायंकाळी तेथे गेले होते. सोसायटीत नोंद करताना पंकज हा रोख असलेली बॅग घेऊन दुचाकीवरून घेऊन पळून गेला होता. हा प्रकार चालकाच्या निदर्शनास येताच त्याने ही माहिती त्याच्या तक्रारदार विकासक मालकाला दिली. त्यानंतर त्याने कांदिवली पोलीस ठाण्यात धाव घेऊन पंकजविरुद्ध चोरीची तक्रार केली. या तक्रारीची पोलिसांनी गंभीर दखल घेत पंकजविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदविला होता. गुन्हा दाखल होताच पळून गेलेल्या पंकजचा पोलिसांनी शोध सुरु केला होता. सीसीटिव्ही चित्रीकरण आणि तांत्रिक माहितीवरुन या पथकाने अवघ्या बारा वाजता कल्याणहून नाशिक महामार्गावरून पळून जाण्याच्या तयारीत असताना पंकजला चौकशीसाठी ताब्यात घेतले. यावेळी पोलिसांसोबत तक्रारदार स्वत जातीने उपस्थित होते. पंकजकडून पोलिसांनी रोख असलेली बॅग ताब्यात घेतल्यानंतर त्यात पोलिसांना २७ लाख रुपये सापडले. उर्वरित पैशांबाबत त्याच्याकडे विचारणा केली असता बॅगेत २७ लाख रुपये होते. त्याने कुठेही पैसे लपविले नाही किंवा पैसे काढले नव्हते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898